Corporate Communications & Investor Relations

Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5

TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 487

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे " दक्षता जागरूकता सप्ताह २०२१ " साजरा

**पुणे दिनांक १ नोव्हेंबर २०२१** : बँक ऑफ महाराष्ट्राच्या मुख्य कार्यालयात एक आठवड्याच्या कालावधीत साजऱ्या केलेल्या " दक्षता जागरूकता सप्ताहाची " दिनांक १ नोव्हेंबर २०२१ रोजी सांगता झाली. महाराष्ट्राचे अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री अतुलचंद्र कुलकर्णी हे सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव, बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा व श्री ए बी विजयकुमार यांच्यासह सर्व सरव्यवस्थापक या सांगता कार्यक्रमास उपस्थित होते.

बँकेत दक्षता संस्कृती रुजविण्यावर बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी आपल्या भाषणात भर दिला. प्रत्येक कर्मचाऱ्याने दक्ष राहून सर्वोच्च दर्जाच्या प्रामाणिकपणा व सचोटीच्या माध्यमातून भ्रष्टाचाराच्या लढाईत झोकून देण्याची व त्या लढाईला पाठबळ देण्याची गरज श्री ए एस राजीव यांनी बोलून दाखविली. बँक ऑफ महाराष्ट्र मधील कर्मचाऱ्यांचा सचोटी निर्देशांक अतिशय उच्च दर्जाचा असल्यामुळे बँकेतील दक्षता बाबींशी संबंधित बाबी अतिशय कमी प्रमाणात असल्याचे नमूद करून त्यांनी यासाठी कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. दक्षता जागरूकतेबाबत बँकेच्या सर्व ग्राहकांना सुमारे १.८७ कोटी लघुसंदेश पाठवून बँकेच्या ग्राहकांना सचोटीची शपथ ऑनलाईन स्वरुपात घेण्याचे आवाहन केल्याचेही त्यांनी नमूद केले. किमान मानवी हस्ताक्षेपासह एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत डिजिटल प्रक्रियेसह प्रणाली व प्रक्रिया यांचे मजबुतीकरण व नियम विनियमांच्या अनुपालनाच्या व पूर्ततेच्या गरजेवरही श्री ए एस राजीव यांनी भर दिला .

महाराष्ट्राचे अतिरिक्त पोलीस महासंचालक व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री अतुलचंद्र कुलकर्णी यांनी या प्रसंगी प्रमुख भाषण करताना बँक ऑफ महाराष्ट्राच्या कर्मचाऱ्यांच्या सोबत दक्षता सप्ताह साजरा करण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व मागील दोन वर्षात तोट्यातील बँक नफ्यात आणण्यासाठी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक केले व बँक अंतिमतः नफ्यात आणल्याबद्दल कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. बँकेत दक्षता विषयक कुठलीच बाब प्रलंबित नसण्याची बाब अभिमानास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. माननीय पंतप्रधानांनी सचोटीने, पारदर्शकतेने व उत्तरदायित्व राखून कारभार करण्यावर जोर दिला असल्याचे नमूद करून आपल्या प्रत्येक कृती व निर्णयाचा त्या दृष्टीकोनातून विचार करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. सार्वजनिक व लोकांच्या पैशांचे व्यवहार करताना पूर्ण दक्षता व सावधानता बाळगावी असा सल्ला देताना स्वतःचे या बाबतीतील काही अनुभव सुद्धा त्यांनी विशद केले. .

सर्वांच्या संयुक्त व सर्वांनी मिळून प्रयत्न केल्यासच समाजातून भ्रष्टाचाराचे निर्मुलन होऊन उच्च नैतिक मुल्ये बाळगणारा स्वावलंबी समाज निर्माण होईल असे मत बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी व्यक्त केले. तसेच बँकेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी बँकेने माहिती तंत्रज्ञानावर आधारित अवलंबलेल्या उपाययोजनांची माहिती दिली .

बँकेचे दुसरे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी दक्षता जागरूकता सप्ताह साजरा करण्याचे प्रयोजन व हेतू विशद केले व व्यवसाय वाढीमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेली बँक ऑफ महाराष्ट्र डिजिटल मंचाचा उपयोग करून घेण्यात व त्यायोगे सचोटीच्या निर्देशांकात सुद्धा अव्वल क्रमांक प्राप्त करेल असा विश्वास व्यक्त केला व जनतेपर्यंत बँक पोहोचण्यासाठी अनेक उपक्रमांची व कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करण्याची गरज प्रतिपादन केली. बँकेच्या विविध शाखांनी व कार्यालयांनी " स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव @ ७५ : सचोटीसह स्वावलंबन " हे घोषवाक्य प्रत्यक्षात येण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांचे व आयोजित केलेल्या विविध उपक्रमांचे विवरण कार्यक्रमात सादर केले. डिजिटल बँकिंग सुविधांचा सुरक्षित वापर कसा करावा याची माहिती व मार्गदर्शन करणाऱ्या दृकश्राव्य माहितीपटाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

दिनांक २६ ऑक्टोबर २०२१ पासून साजऱ्या करण्यात आलेल्या दक्षता जागरूकता सप्ताहामध्ये दक्षता जागरूकतेबाबत प्रश्नमंजुषा व घोषवाक्य लिखाण स्पर्धा, कार्यशाळा, संवेदन कार्यक्रम, कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा, मेळावे, प्रादेशिक भाषांमध्ये रेडियो जिंगल्स, ग्राम सभेत दक्षतेबाबत जनजागरण कार्यक्रम, स्वयंसहाय्यता बचत गटांशी संवाद व भेटी इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बँकेच्या देशभरातील सुमारे ४० विभागीय कार्यालयात कर्मचारी व सर्वसामान्य जनतेच्या सक्रीय सहभागाने दृक्श्राव्य व ई माध्यमातून शपथ प्रदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता

" दक्षता जागरूकता सप्ताहाच्या दरम्यान बँकेच्या सर्व शाखांनी " ग्राहक सभांचे आयोजन केले होते. सदर सप्ताहाच्या दरम्यान दक्षतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी व सचोटीची शपथ ऑनलाईन घेण्यासाठी बँकेच्या सर्व ग्राहकांना लघुसंदेश ( एस एम एस ) पाठविण्यात आले होते. तसेच सचोटीची शपथ ऑनलाईन घेण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या संकेतस्थळावरील लिंक देखील पाठविण्यात आली होती.

दक्षता जागरूकता सप्ताहाच्या कार्यक्रमांत बँकेच्या मुख्यालयातील व विभागीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी दृक्श्राव्य माध्यमातून ऑनलाईन सहभागी झाले होते. बँकेच्या उपसरव्यवस्थापक श्रीमती मृदुल जोगळेकर यांनी आभार प्रदर्शन केल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली .




**फोटो कॅप्शन**: (डावीकडून उजवीकडे) श्री हेमंत टम्टा (कार्यकारी संचालक बँक ऑफ महाराष्ट्र), श्री ए.एस. राजीव (एमडी आणि सीईओ बँक ऑफ महाराष्ट्र), श्री अतुलचंद्र कुलकर्णी, (अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य) आणि श्री ए.बी. विजयकुमार (कार्यकारी संचालक बँक ऑफ महाराष्ट्र)